PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 7, ISSUE 3

# खरा ख्रिस्ती धर्म काय आहे ?

विश्वास गोरखनाथ वळवी
( संशोधक विद्यार्थी )
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव
महाराष्ट्र भारत

जागतिक विश्वात प्रत्येक धर्माची एक विशिष्ट अध्यात्मिक तत्वे आणि ग्रंथ आहेत. तसेच प्रत्येक धर्माचे प्रचार करण्याचे देखील वैशिष्ट्ये आणि प्रकार आहेत. हे विश्व सध्या अनेक राष्ट्रात विलीन झालेले असून त्यांच्या केंद्रस्थानी लोकशाही, मानवतावाद आणि नैतिक मूल्ये दडलेली आहेत. त्यामुळे ख्रिस्ती धर्म देखील आपल्या मूळ आरशातून तेव्हाच दिसतो, जेव्हा त्याचे आध्यात्मिक पैलू पाडण्याचा प्रयत्न केला जातो. लोकसंख्येच्या दृष्टीने आज जगात ख्रिस्ती धर्म प्रथमस्थानी आहे. पण खर्या ख्रिस्ती धर्माची त्यातून ओळख होते का ? खरा ख्रिस्ती धर्म हा ख्रिस्त आणि पवित्रशास्त्रावर आधारलेला आहे. ख्रिस्ताचे पुनरुत्थान आणि त्यावर विश्वास ठेवून संपूर्ण आयुष्य देवाच्या कृपेवर चालणारी व्यक्तिमत्वच खरा ख्रिस्ती धर्म समजू शकतात. खऱ्या ख्रिस्ती धर्माची धर्ममूल्य अथवा धर्मतत्वे पुढीलप्रमाणे.

## १. खऱ्या ख्रिस्ती धर्माचा आधार ख्रिस्त आहे :

इसवी सन ३१३ पर्यंत ख्रिस्ती धर्म हा धर्म म्हणून वावरत नव्हता. अगोदरच्या तीन शतकात तो पूर्णपणे ख्रिस्ताचा पुनरुत्थान आणि महान आज्ञेवर चालणारा सुधारणावादी गट होता आणि त्याचा आधार हा ख्रिस्त होता. चौथ्या शतकात ख्रिस्ती धर्ममूल्यांना राजकीय मान्यता देऊन त्या धर्मतत्वांना रोमचा राज्यधर्म म्हणून जाहीर केले आणि येशू ख्रिस्ताच्या शिक्षणाला तो धर्म म्हणून राजकारणात गोवलो गेलो. ख्रिस्ताला दुय्यम स्थान आले. प्रथमतः प्रिस्ट आणि आराधनालये आलीत. ज्यामुळे सेंट ऑगस्टीन यांनी खरा ख्रिस्ती धर्म काय आहे ? हे समजून घेण्यासाठी 'द सिटी ऑफ गोड' हे पुस्तक लिहून लोकांना जागृत केले. हा प्रवाह धर्मसुधारणा आणि नंतर मिशनरी चळवळीमुळे वाढत गेला.

त्यामुळे पुन्हा ख्रिस्त प्रथमस्थानी आला. आधुनिक मंडळीपुढे आता सर्वात मोठे आव्हान ख्रिस्त आणि पवित्रशास्त्रावर आधारित जीवन जगणे, हा होय. कारण खऱ्या ख्रिस्ती धर्माचा आधार तोच आहे. धर्म म्हणून ख्रिस्ती धर्मतत्वांना गोवले गेले. त्याला आज १८०० वर्षे लोटली गेली. पण खऱ्या ख्रिस्ती धर्माच्या धर्ममूल्यांना कोणीही मीटवू अथवा हरवू शकले नाही. कारण ख्रिस्त आणि पवित्रशास्त्र यांच्या सत्यापुढे असत्य तत्वांचा नेहमी पराजय झाला आणि होत आहे, कारण अंतिम विजय ख्रिस्ताचा आहे.

## २. खऱ्या ख्रिस्ती धर्माचा आधार पवित्र शास्त्र आहे :

प्रभू येशू ख्रिस्तम्हणतात, मी नियमशास्त्राचा नाश करण्यासाठी नाही तर त्याला पूर्ण करण्यासाठी आलेलो आहे. ख्रिस्ताने आपले शिक्षण हे नेहमी पित्याच्या अधीनतेत राहून आणि नियमशास्त्राची उदाहरणे देऊन दिले. त्याचा स्वतःसंबंधी असलेल्या भविष्यवाण्या ज्या जुन्या करारावर आधारलेल्या होत्या. त्या पूर्ण होणार होत्या. म्हणून ख्रिस्ताने नवीन कराराचे शिक्षण जाहीर केले. हा नवा करार ख्रिस्ती धर्माचा मूलाधार आहे. गेल्या दोन हजार वर्षात पवित्रशास्त्रावर अनेक हल्ले झाले. त्यांना जाळण्यात आले. त्याचे अस्तित्व अनेक लोकांनी मिटविण्याचे प्रयत्न केले. त्यात खोटेपणा घालण्याचा प्रयत्न केला. पण ते आजही सत्यावर टिकून आहे. कारण ते देवाच्या प्रेरणेने लिहिले गेलेले ईश्वरप्रेरित शब्द आहेत. पवित्रशास्त्रात लिहिले आहे, "संपूर्ण शास्त्रलेख देवाने प्रेरलेला आहे आणि तो शिक्षण, निषेध, समाजसुधारक व न्यायीपणाचे शिकवणे याकरिता उपयोगी आहे. यासाठी की देवाचा माणूस पूर्ण व प्रत्येक चांगल्या कामास सज्ज व्हावा."[१] खरा ख्रिस्ती धर्म पवित्रशास्त्राच्या प्रत्येक शब्दावर आधारलेला आहे. त्यामुळे एका खऱ्या ख्रिस्ती मनुष्याचा मूलाधार ख्रिस्तानंतर पवित्रशास्त्रात असतो. पवित्रशास्त्राचे मनन, चिंतन आणि त्याचप्रमाणे प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीचे कर्तव्य आहे. यहोसवाच्या पुस्तकात लिहिलेले आहे, "नियमशास्त्राचे पुस्तक तुझ्या तोंडातून निघून जाऊ नये, तर दिवसा आणि रात्री तू त्यावर ध्यान लाव यासाठी की, जे सर्व त्यात लिहिले आहे. त्याप्रमाणे करण्यास तू जपावे, कारण तेव्हा तू आपला मार्ग सफल करशील आणि तेव्हा तू सुज्ञतेने वागशील."[२]

आज ख्रिस्ती धर्मात काही खोटे पंथ घुसलेले आहेत आणि त्यांना आळा तेव्हाच बसू शकतो, जेव्हा त्यांच्यासमोर पवित्र शास्त्राचे सत्य शिक्षण प्रचारित होऊ शकते. एक खरा ख्रिस्ती पवित्रशास्त्रला कधीही आपल्यापासून दूर ठेवत नाही. तो दिवस आणि रात्री म्हणजेच सुवेळी-अवेळी पवित्रशास्त्राच्या वचनाप्रमाणे आपले जीवन जगत असतो. भजनकर्ता म्हणतो, "सूखी तो पुरुष, जो दुसऱ्यांच्या मसलतिने

चालत नाही व पापाच्या मार्गात उभा राहत नाही व तिरस्काराच्या आसनी बसत नाही. तर यहोवाच्या नियमशास्त्रात त्याला संतोष आहे आणि तो दिवसा व रात्री नियमशास्त्रात ध्यान लावतो."[३] इतिहासात अशी अनेक उदाहरणे आहेत, ज्यांनी पवित्रशास्त्रच्या जोरावर संजीवन आणले. पण त्यात ख्रिस्त प्रथम आहे आणि त्यानंतर सेंट ऑगस्टीन आणि मार्टिन ल्युथर. तो प्रत्येक ख्रिस्ती व्यक्ती खरा ख्रिस्ती आहे, ज्याने वचनांवर चालून पवित्रशास्त्र संजीवन आणलेले आहे. सेंट ऑगस्टीन आणि मार्टिन ल्युथर यांनी १००० वर्षाच्या काळांवर परिणाम होईल. एवढे मोठे सजीवन आणले. पवित्रशास्त्रावर आधारित तारणाचे शिक्षण सद्सदविवेक अंधकारमय युगात प्रथमतः याच दोघांनी आणले.

### ३. खऱ्या ख्रिस्ती धर्माचा मूलाधार त्रेकदेव आहे :

ख्रिस्ती धर्मात अनेक पंथ हे स्वतःच्या एकेरी तत्वात गोवण्यात आले आहे. कोणी सांगते फक्त ख्रिस्तच देव आहे. कोणी सांगते फक्त याहोवा, तर काही ख्रिस्ती पंथ फक्त पवित्रआत्म्यावर भर देत आहे. पण खऱ्या ख्रिस्ती धर्माच्या मूलाधार हा त्रेकदेवातील तिन्ही व्यक्ती म्हणजे पिता-पुत्र-पवित्र आत्मा आहे. कार्यशैलीत तिघांचे कार्य वेगवेगळे आहे आणि पवित्रशास्त्रच त्याचा साक्षी आहे. त्यामुळे कोणीही या त्रेकदेवातील पित्याला मान्य करून बाकी दोघांचे अस्तित्व अमान्य करू शकत नाही. कारण पुत्राची संपूर्ण साक्ष नवा करार देतो. पुत्राला स्वीकारून पित्याला नाकारू शकत नाही. कारण जुना करार हा याहावेच्या कार्याचा साक्षी आहे. पवित्रशास्त्रावर अति कार्यशील पॅन्टीकोस्टल मंडळ्या पवित्रशास्त्र आणि त्रेकदेवातील प्रकटीकरणाला समजण्यात काही अंशी चुका करीत असल्या तरी त्यांना त्याचा आधार घेणे क्रमप्राप्त आहे.

त्रेकदेवाचे कार्य पवित्रशास्त्रात वेगवेगळ्या ठिकाणी दाखविलेले आहे आणि त्यात ते तीन वेगवेगळ्या कार्यात दिसत आहे. प्रभू येशू ख्रिस्ताचा बाप्तिस्मा हा प्रथम आणि मूलाधार आहे. (मत्तयकृतशुभवर्तमान : इ.१३.१७) तसेच ख्रिस्ताची महान आज्ञा त्यात पिता पुत्र आणि पवित्र आत्मा यांचा उल्लेख आहे.

### ४. खरा ख्रिस्ती धर्म शुद्ध आचरण आणि ख्रिस्तीमय जीवनशैलीत जगण्यात आहे :

ख्रिस्ती धर्म ही एक जीवनशैली आहे आणि त्याच्या मुळाशी पवित्रशास्त्र आणि पवित्रआत्म्याचे मार्गदर्शन असते. त्यामुळे एक खरा ख्रिस्ती व्यक्ती फक्त धर्माच्या नावावर आपल्या जीवनाचा दिंडोरा पिटवत बसत नाही तर शुद्ध आचरण आणि पवित्रशास्त्रवचनाप्रमाणे आपले जीवन व्यतीत करतो.

जेणेकरून त्याचे जीवन हे लोकांना ख्रिस्ताकडे अथवा सत्याकडे नेण्यास मदत करेल. म्हणजे ख्रिस्ती धर्माचा मूलाधार शुद्ध आचरण म्हणजे प्रीती, दया, अहिंसा, सद्भाव, मानवसेवा, दीनदुबळ्यांची काळजी घेणे इत्यादी घटकातून प्रदर्शित होते. आपल्या शेजाऱ्यावर आपल्या समान प्रीती कर. म्हणजे जरी ख्रिस्ती व्यक्ती स्वतःवर प्रीती करतो, तशी त्याने त्या प्रत्येक मनुष्याशी करायला हवी, जो गरजवंत आहे. खरा ख्रिस्ती धर्म जीवन जगण्याची ती कला आहे. ज्यात मनुष्याचे तारणाचे मार्ग मोकळे होते आणि तो अध्यात्मिक मोक्षाच्या द्वाराकडे पोहोचू शकतो. त्यामुळे ख्रिस्ती धर्मातील बरीच लोक ख्रिस्ती धर्माला धर्म न मानतात ते जीवन जगण्याची कला, असे संबोधतात. त्या जीवनाचा आधार ख्रिस्त आहे.

## संदर्भसूची:-

1) तिमथ्यकरास, दुसरे पत्र, अध्याय ३, वचन १६, पवित्रशास्त्र
2) यहोशवा, अध्याय १, वचन ८, पवित्रशास्त्र
3) स्तोत्रसहिता अध्याय १ वचन १-२,पवित्रशास्त्र